आयोजक :

RASHTRAWADI
Welfare Trust

# योद्धा @ ८०

अजूनी चालतोची वाट...

## शॉर्ट फिल्म स्पर्धा २०२०

देशाचे नेते, माजी केंद्रिय कृषी मंत्री, पद्मविभूषण **मा. शरदचंद्रजी पवार साहेब** यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने **'योद्धा@ ८०' शॉर्टफिल्म स्पर्धा २०२०** आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने राज्यभरात सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. त्याअनुषंगानेच हा उपक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

### १) उद्देश :

**'योद्धा@ ८०'** शॉर्टफिल्म स्पर्धा ही आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या राजकीय व सामाजिक कारकिर्दीची माहिती लघुपटाच्या माध्यमातून तरूण पिढीपर्यंत पोहचावी व आताच्या काळातील फिल्म मेकिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या युवक-युवतींकडून साहेबांच्या कारकिर्दीवर चांगल्या कलाकृतींची निर्मिती व्हावी, हा या स्पर्धेच्या आयोजनामागील उद्देश आहे. तसेच या स्पर्धेच्या निमित्ताने राज्यभरातील कलावंत तरूण तरुणींना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होऊन त्यांना आपले काम जगासमोर आणण्याची मोठी संधी या स्पर्धेच्या निमित्ताने मिळणार आहे.

### २) पारितोषिके :

१. **सर्वोत्कृष्ट शॉर्टफिल्म** :
करंडक, प्रमाणपत्र तसेच रोख रु. १,००,०००/- (दिग्दर्शकास)

२. **द्वितीय पारितोषिक :**
करंडक, प्रमाणपत्र व रोख रु. ७५,०००/- (दिग्दर्शकास)

३. **तिसरे पारितोषिक :**
करंडक, प्रमाणपत्र व रोख रु. ५०,००० /- (दिग्दर्शकास)

४. **वरील पारितोषिकांव्यतिरिक्त पुढील पारितोषिके देखील दिले जातील.**

**अ) विशेष पारितोषिक (एकूण १२) :**
विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई (एमएमआरडीए विभाग) विभागातील प्रत्येकी एका शॉर्टफिल्मला ज्युरी पसंतीचे विशेष पारितोषिक व याव्यतिरिक्त वरील ६ (सहा) विभागातील महिला दिग्दर्शकांच्या ६ निवडक शॉर्टफिल्मला विशेष पारितोषिक, प्रमाणपत्र व रु.१०,०००/- रोख रकमेचे बक्षीस देण्यात येईल.

**ब) विशेष पारितोषिक (एकूण २) :**
वर नमूद केलेल्या महाराष्ट्रातील विविध विभागांच्या व्यतिरीक्त महाराष्ट्राबाहेरील प्रवेशिका असलेल्या एका शॉर्टफिल्मला ज्युरी पसंतीचे विशेष पारितोषिक तसेच एलजीबीटी घटकातील एका दिग्दर्शकास ज्युरी पसंतीने निवडलेले विशेष पारितोषिक, प्रमाणपत्र व रु.१०,०००/- रोख रकमेचे बक्षीस देण्यात येईल.

**क) प्रेक्षक पसंती पारितोषिक (एकूण ३) :**
सुप्रिया सुळे या यूट्यूब चॅनेलवर सर्वाधिक लाईक्स मिळविणाऱ्या पहिल्या तीन शॉर्टफिल्मला विशेष पारितोषिक, प्रमाणपत्र व रु.१०,०००/- रोख रकमेचे बक्षीस देण्यात येईल.

प्रवेशिका अर्ज डाऊनलोड करण्यासाठी
www.ncp.org.in
www.supriyassule.com
प्रवेशिका पाठविण्यासाठी ई-मेल आयडी
rwtshortfilm@ gmail.com

५) सदरील स्पर्धेचा निकाल आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त दि. १२ डिसेंबर २०२० रोजी जाहीर करण्यात येईल व नंतर पुढील काळात पारितोषिक विजेत्या सर्व शॉर्टफिल्मचे मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष स्क्रिनींग करून पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात येईल.

## ३) स्पर्धेकरीता विषय :

खालील विषयापैकी कोणत्याही एका विषयावर शॉर्टफिल्म तयार करणे अपेक्षित आहे.

**१) महिला विकासात मा. शरद पवार साहेबांचे योगदान**
(संदर्भ : देशातील पहिले राज्य महिला धोरण ते स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण असे महिला विकाससंदर्भातील अनेक निर्णय)

**२) फुले-शाहू-आंबेडकर : पुरोगामी विचारांचे पाईक मा. शरद पवार साहेब**
(संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्ताराचा निर्णय व राज्यात सामाजिक न्यायाशी निगडीत अनेक महत्त्वाचे निर्णय)

**३) मा. शरद पवार साहेबांचे कृषी क्षेत्रातील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय योगदान**

**४) महाराष्ट्राच्या औद्योगीक विकासात मा. शरद पवार साहेबांचे योगदान**

**५) कला-साहित्य-संस्कृती : रसिकाग्रणी मा. शरद पवार साहेब**

**६) क्रीडा क्षेत्राचे आधारस्तंभ : मा. शरद पवार साहेब**

**७) आपत्तकालीन प्रसंगातील संकटमोचक : मा. शरद पवार साहेब**
(संदर्भ : किल्लारी भूकंप, मुंबई बॉम्बस्फोट, भूज-गुजरात भूकंप, एनडीआरएफची स्थापना व अनेक निर्णय)

**८) महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील संस्थात्मक उभारणीचे आधारस्तंभ : मा. शरद पवार साहेब**

**९) लोक माझे सांगाती : मा. शरद पवार साहेब**

**१०) मा. शरद पवार साहेब : एक समग्रदर्शन**

## ४) पात्रता :

१) स्पर्धेत जास्तीत जास्त ३ मिनिट कालावधीची शॉर्टफिल्म स्विकारली जाईल, ज्यात फिल्मच्या ओपनिंग व क्लोजींग क्रेडिटचा समवेश राहील.

२) शॉर्टफिल्मच्या सुरुवातीला स्पर्धेच्या उपरोक्त विषयांपैकी आपण निवडलेला विषय ठळक अक्षरात नमूद करणे आवश्यक राहील.

३) चित्रपट निर्मात्यांनी/दिग्दर्शकांनी आपल्या शॉर्ट फिल्मच्या प्रवेशिका गुगल ड्राईव्ह लिंकसह सोबत दिलेल्या प्रवेशिका अर्जासोबत **rwtshortfilm@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवाव्यात. प्रवेशिका अर्ज **www.supriyassule.com** व **www.ncp.org.in** या दोन्ही वेबसाईटवर डाऊनलोड करीता उपलब्ध आहेत.

अ. स्पर्धेतील प्रवेशासाठी शॉर्टफिल्मची केवळ गुगल ड्राईव्ह लिंक स्विकारली जाईल. गुगल ड्राईव्ह लिंकला डाउनलोड पर्याय असणे आवश्यक आहे

ब. व्हीडीओ फाइल MP 4 किंवा .MOV स्वरूपात, HD Quality quality (720p or 1080p), size not more than 500 Mb, 5.1 or 2.0 channel audio embedded, Stereo or Mono sound मोबाईल फोनवर चित्रीत व संकलित केलेल्या शॉर्टफिल्म स्वीकारल्या जातील.

क. गुगल ड्राईव्ह लिंक सोबत नोंदणी अर्ज, अटी व नियमांच्या पानांवर स्वाक्षरीसह स्कॅन करून (पृष्ठ क्र. ५, ६, ७ केवळ) पीडीएफ फॉरमॅटमध्ये ई-मेलवर पाठविण्यात यावा.

४) आपणास दि. १२ नोव्हेंबर २०२० रोजी पासून ०५ डिसेंबर २०२० पर्यंत शॉर्टफिल्म स्पर्धेकरिता पाठविता येतील.

५) कोणत्याही भाषेत किंवा संवादाविना बनविलेल्या शॉर्टफिल्म स्वीकारल्या जातील.

६) शॉर्टफिल्म दिग्दर्शकास वयाची कोणतीही मर्यादा नाही.

७) सबमिट केलेल्या शॉर्टफिल्म प्राथमिक निवड प्रक्रियेमधून जातील आणि निवडलेल्या शॉर्टफिल्म सर्व जनतेसाठी सुप्रिया सुळे यु-ट्यूब चॅनेलवर (https://www.youtube.com/c/supriyasulencp) अपलोड केल्या जातील.

८) प्रत्येक निवडलेल्या शॉर्टफिल्मचे परिक्षण नामंकित ज्युरी कमिटीकडून केले जाईल. शॉर्टफिल्मच्या ज्युरी रेटिंग्ज व सुप्रिया सुळे यु-ट्यूब चॅनेलवरील सदरील शॉर्टफिल्मला मिळालेल्या लाईक्स पसंती परिणामसाठी विचारात घेतल्या जातील. यु-ट्यूब चॅनेलवर शॉर्टफिल्मच्या व्ह्यूज विचारात न घेता केवळ लाईक्स विचारात घेतल्या जातील.

९) जर यु-ट्यूब कॉपीराईट क्लेममुळे एखादी शॉर्टफिल्म यु-ट्यूबने चॅनलवरून ब्लॉक केली, तर त्याला संयोजक जबाबदार राहणार नाही. तरी देखील सदरील शॉर्टफिल्मची प्रवेशिका स्पर्धेत ग्राह्य धरल्या जाईल.

## ५) शॉर्टफिल्म सबमिट करण्याची प्रक्रिया :

अ) ई-मेलद्वारे पाठविण्यात आलेल्या प्रवेशिका केवळ विचारात घेतल्या जातील. पेन ड्राईव्ह अथवा अन्य कुठल्या माध्यमातून आलेल्या प्रवेशिका विचारात घेतल्या जाणार नाही.

ब) सर्व निवडक शॉर्टफिल्म्स् शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२० पासून सार्वजनिकपणे पाहण्यासाठी सुप्रिया सुळे अधिकृत यु-ट्यूब चॅनेलवर (https://www.youtube.com/c/supriyasulencp) टप्प्याटप्प्याने अपलोड केल्या जातील.

ड) प्रवेशिकांच्या व्हीडीओ फाईलमध्ये तांत्रिक समस्या आढळल्यास सदरिल प्रवेशिका अपात्र घोषित केल्या जातील.

इ) एक शॉर्टफिल्म निर्माता/दिग्दर्शक एका वेळी एकापेक्षा जास्त शॉर्टफिल्म प्रवेशिका दाखल करू शकतो.

## ६) संदर्भ साहित्य :

शॉर्टफिल्म दिग्दर्शक व टीमला आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांचे आयुष्य व त्यांची आजवरची कारकिर्द समजून घेण्यासाठी आम्ही आयोजक या नात्याने खालील संदर्भ देत आहेत. आपणांस आवश्यकता असल्यास त्यातील मुद्यांचा उपयोग आपण आपल्या प्रवेशिकेत करू शकता.

१) आदरणीय साहेबांच्या विविध भाषणांचा समवेश असलेले यु-ट्यूब चॅनेल :
https://www.youtube.com/c/SharadPawarImages/

२) आदरणीय साहेबांची आत्मकथा (इंग्रजी आवृत्ती) : **On My Terms**
https://www.amazon.in/dp/9385755390/ref=cm_sw_r_wa_apa_i_d0wPFbT2DNJ9W

३) आदरणीय साहेबांची आत्मकथा (मराठी आवृत्ती) : लोक मझे सांगाती
https://www.amazon.in/dp/8174349383/ref=cm_sw_r_wa_apa_i_40wPFbR5VDM1P

४) आदरणीय साहेबांची आत्मकथा (ऑडिओ बुक) : लोक मझे सांगाती
https://www.storytel.com/in/en/books/1035449-Lok-Maze-Sangati

५) आदरणीय साहेब अमृत महोत्सव फिल्म :
https://youtu.be/BjFmMq9DxD8

६) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापना फिल्म :
https://youtu.be/xUsXsGf2Hac

७) स्टोरीटेल ऑडिओ बुक (पहिला भाग)
https://youtu.be/6SKgAg99C64

## ७) प्रवेश फी :

या स्पर्धेत शॉर्टफिल्म सादर करण्यासाठी प्रवेश फी असणार नाही.

# योद्धा @ ८०

अजूनी चालतोची वाट...

**शॉर्ट फिल्म स्पर्धा २०२०**

## ८) अर्जदार / शॉर्टफिल्म दिग्दर्शक / निर्मात्यांकरिता महत्त्वपूर्ण नियम :

१) या शॉर्टफिल्म स्पर्धेतील सहभागाचा अर्थ असा आहे की, आपणास येथे नमूद केलेले सर्व नियम मान्य आहेत.

२) निर्माता, दिग्दर्शक आणि अर्जदार यांची जबाबदारी आहे की त्यांनी या स्पर्धेत शॉर्टफिल्म सादर करण्यास कायदेशीररित्या हक्क बजावले आहेत. शॉर्टफिल्मच्या किंवा त्यात दाखविलेल्या कुठल्याही व्हिडिओ अथवा ऑडिओच्या हक्कांबाबत वाद उद्भवल्यास त्याची जबाबदारी निर्माता, दिग्दर्शक यांची असेल.

३) शॉर्टफिल्मच्या ऑनलाईन व ऑफलाईन प्रक्षेपणाचे अधिकार निर्माता व दिग्दर्शक यांच्या समवेतच स्पर्धेत प्रवेशिका दाखल केल्यानंतर स्पर्धा आयोजकांचे देखील राहतील. स्पर्धा आयोजक आगामी काळात प्रवेशिका सादर केलेली शॉर्टफिल्म अधिकृतपणे यु-ट्यूब चॅनेलवर, दूरचित्रवाहिणीवर, सभांमध्ये, ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रक्षेपित करू शकतात.

४) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

५) स्पर्धेच्या नियमात व नियोजनात ऐनवेळी बदल करण्याचे अधिकार संयोजकांनी राखून ठेवले आहेत.

मी / आम्ही राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने आयोजित **'योद्धा @ ८०'** शॉर्टफिल्म स्पर्धा-२०२० करीता प्रवेशिका दाखल करीत असून स्पर्धेची सर्व अटी व नियम आम्हास मान्य आहेत. कृपया आमची प्रवेशिका स्पर्धेकरिता ग्राह्य धरण्यात यावी, ही विनंती.

दिनांक :    /    /२०२      अर्जदाराची स्वाक्षरी ____________________

ठिकाण : ____________________      नाव : ____________________

मोबाईल नं. | | | | | | | | | | |

(या नियमावलीसमवेत दिलेला प्रवेशिका अर्ज भरून देणे बंधनकारक आहे.)

---

**स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी संपर्क :**

**१) महेश हरबक - 9834602449   २) सुबोध जाधव - 9823067879**

**३) सागर राऊत - 7972937993**

# Entry Form *For*
# *Warrior @ 80*
# Short Film Competition 2020

**1. Film Details :**

Title of the Film: ______________________________
*(IN CAPITAL LETTERS)*

Language(s)*: ______________________________

Shooting Format*: ______________________________
*(Please specify the camera format on which this short film was shot)*

Running Time*: ____________ *(in minutes)*

Tint*: i. Colour ii. Black & White iii. Colour and Black & White

Synopsis: ______________________________
*(Maximum 60 words)* ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**2. Director(s)*:**

Name (1)*: ______________________________

Age : ______________________________

Gender : Male ☐ Female ☐ Transgender ☐

If you belong to the LGBTQIA+Community, kindly click on this check box ☐

Address: ______________________________

______________________________

Cell (1)*: ____________________ Cell (2): ____________________

Email : ____________________ Web: ____________________

**3. Producer(s)*:**

Name (1)*: ______________________________

Address*: ______________________________

______________________________

Cell*: ________________________________ Email*: ______________________________

**4. Editor:** ________________________________________________________________

**5. Music:** ________________________________________________________________

**6. Applicant's Details*:**

Name*: ________________________________________________________________

Address*: ________________________________________________________________

________________________________________________________________

Cell*: ________________________________ Email*: ______________________________

The applicant agrees to have read and accepted the rules & regulations for participation in the **Warrior @ 80 Short Film Competition - 2020**. The applicant confirms that he / she has the requisite authority or has obtained the requisite authority from the producer / right holder to enter this film in this Competition and make available all the requisite material for it.

______________________________ ______________________________

(Date & Place) (Applicant's Signature)*

Enclose with this form:

1. Film stills (Not mandatory)
   *(2 photos (minimum 1 is mandatory), each stills of max. 300 dpi, max. 1 Mb size, in .jpg/.jpeg format)*

2. Director's profile pic
   *(2 photos (minimum 1 is mandatory), each stills of max. 300 dpi, max. 1 Mb size, in .jpg/.jpeg format)*

3. Director's proof of residence and photo-ID
   *(AADHAAR or passport or electricity bill or bank passbook can be submitted as address proof.
   AADHAAR or passport or College-ID or PAN which has photo and mentions date of birth can be submitted as photo-ID proof.
   Max. 300 dpi, max. 1 Mb size, in .jpg/.jpeg or pdf format)*

4. Producer's proof of residence
   *(AADHAAR or passport or electricity bill or bank passbook can be submitted as address proof.
   AADHAAR or passport or College-ID or PAN which has photo and mentions date of birth can be submitted as photo-ID proof. Maximum 300 dpi, Maximum 1 Mb size, in .jpg/.jpeg or pdf format)*

**For Official Use only :**

1) Entry No................................ 2) District .................................. 3) Region ................................